रयत शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी

## सेंट्रल लायब्ररी

## वाचन प्रेरणा दिन

## विद्यार्थ्यांसाठी सूचना

**दि. ०९. १०. २०२०**

महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर **१५ ऑक्टोबर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन** आपण एक आगळावेगळा उपक्रम घेऊन साजरा करणार आहोत. श्रवण, भाषण, वाचन, लेखन हा शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे. त्यावर आधारित **' एक पान प्रतिभेचं...'** हा उपक्रम वाचन व सादरीकरण या कौशल्यांचा विकास व्हावा, या दृष्टीने आयोजित करण्यात आला आहे.

**या उपक्रमासाठी तुम्हाला आवडलेल्या प्रतिभासंपन्न लेखकाच्या कोणत्याही पुस्तकातील एका पानाचे वाचन करून, त्याचा व्हिडिओ तयार करून आमच्याकडे १४ ऑक्टोबर २०२० पर्यंत पाठवायचा आहे.** कविता आणि नाटक वगळून, इतर कोणताही साहित्य प्रकार, लेखनाचे अभिवाचन आपण करू शकता.

व्हिडिओ पाठवताना, सुरुवातीला स्वतःचे नाव, कॉलेजचे नाव, वर्ग, पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशकाचे नाव आवर्जून सांगावे. ते पुस्तक, त्यातील पान तुम्हाला का आवडले, हे सुद्धा सांगा, म्हणजे त्यातून तुमची अभिरुची, वाचनाचा व्यासंग सर्वांना समजेल. एका विद्यार्थ्याने एकच व्हिडिओ पाठवायचा आहे. **हा व्हिडिओ तयार करताना आवाजातील चढउतार, भावपूर्णता, उच्चार, स्पष्टता, सादरीकरण शैली, याला यात महत्त्व आहे, हे लक्षात घ्यावे. व्हिडिओ पाठविणेसाठी तुम्हाला गुगल फॉर्मची लिंक देण्यात येईल, त्यावर तुम्हाला तुमचा व्हिडिओ अपलोड करता येईल. व्हिडिओ चा साइज १०एम. बी. च्या आत असावा.** अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. निवडक सादरीकरणांचे व्हिडिओ महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रदर्शित केले जाणार आहेत , जेणेकरून इतरांनाही यातून प्रेरणा मिळेल व वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

| | |
|---|---|
| LIBRARIAN | PRINCIPAL |
| Karmaveer Bhaurao Patil College, Vashi, Navi Mumbai-400703. | Karmaveer Bhaurao Patil College, Vashi, Navi Mumbai-400703 |

Scanned with CamScanner